# लेखक-पत्रकार श्रीपाद ब्रह्मे यांच्या 'फर्स्ट डे फर्स्ट शो' पुस्तकाचा रंगला 'प्रीमिअर'

▪ पाच दिग्गज पत्रकार-समीक्षक मित्रांच्या हस्ते आगळेवेगळे प्रकाशन






**पुणे, (प्रतिनिधी) :**

स्थळ - महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माधवराव पटवर्धन सभागृह.

वेळ - सकाळी साडेदहाची; वार - शुक्रवार आणि तारीख - १८ नोव्हेंबर २०१६.

या दिवशी या सभागृहाने अनुभवला एक आगळावेगळा '७० एमएम' प्रकाशन सोहळा...

लेखक-पत्रकार श्रीपाद ब्रह्मे यांच्या 'फर्स्ट डे फर्स्ट शो' या पुस्तकाचे प्रकाशन 'हाउसफुल्ल' गर्दीत पार पडले. कामाचा दिवस आणि सकाळची वेळ असूनही मसापचे सभागृह रसिकांनी फुलून गेले होते. 'चपराक प्रकाशन' आणि ब्रह्मे यांच्या आप्तेष्ट आणि मित्रजनांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून हा प्रकाशनाचा 'प्रीमिअर' सोहळा संस्मरणीय केला.

श्रीपाद ब्रह्मे गेली २० वर्षे पत्रकारितेत आहेत. यातील सुमारे अकरा वर्षांच्या (२००३ ते २०१४) काळात त्यांनी 'सकाळ' आणि 'महाराष्ट्र टाइम्स' या दोन वृत्तपत्रांत काम करताना तब्बल ३०७ चित्रपटांची परीक्षणे लिहिली. यातील निवडक ५० परीक्षणांचे (२५ मराठी आणि २५ हिंदी) हे पुस्तक! या पुस्तकाचे प्रकाशन करण्याची संकल्पनाही आगळीवेगळी होती. एखादा नामांकित स्टार किंवा अभिनेत्री यांना बोलावण्यापेक्षा ब्रह्मे यांनी त्यांच्या कारकिर्दीत त्यांच्यासोबत काम करणाऱ्या पाच समीक्षक मित्रांच्या हस्तेच हे प्रकाशन करण्याचे ठरविले. त्यानुसार अभिजित पेंढारकर, मंदार कुलकर्णी, अभिजित थिटे, महेश बर्दापूरकर आणि जयदीप पाठकजी या पाच चित्रपट समीक्षकांच्या हस्ते मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात प्रकाशन पार पडले. या औपचारिक प्रकाशनानंतर कार्यक्रमस्थळी या सहा मित्रांच्या रंगलेल्या गप्पांनी खऱ्या अर्थाने हा सोहळा संस्मरणीय ठरला.

पाचही पाहुणे अनुभवी, वेगवेगळ्या शैलीत लिहिणारे आणि बोलणारे. त्या सर्वांनी मिळून हजारहून अधिक सिनेमांची वृत्तपत्रीय परीक्षणे लिहिलेली... अशा पाच नामवंतांना बोलते केले सूत्रसंचालिका स्नेहल दामले यांनी. लेखक श्रीपाद ब्रह्मे यांचाही अर्थात या गप्पांत प्रमुख सहभाग होता. ब्रह्मे यांना त्यांच्या चित्रपटांची सुचणारी आकर्षक शीर्षके, चित्रपट परीक्षण करताना येणारे वेगवेगळे अनुभव, चित्रपटसृष्टीतील मित्रांचा मिळणारा प्रतिसाद, चित्रपटगृहांशी जडणारे नाते, तेथील कर्मचारीवर्गाशी जुळणारे भावबंध, फिल्म फेस्टिव्हल्सचे वातावरण, चित्रपट रसास्वाद कार्यशाळांचा होणारा उपयोग, वृत्तपत्रीय कामकाज करताना वेळ पाळताना उडणारी धांदल, प्रीमिअरच्या वेळी होणारी धमाल, सिनेमाचे शो रद्द होण्याचे प्रकार आणि त्यातून होणारा मनस्ताप या आणि अशा अनेक किश्श्यांनी ही गप्पांची मैफल रंगली. रसिकांनी अनेकदा टाळ्या वाजवून आणि हास्यकल्लोळात या गप्पांना दाद दिली.

तत्पूर्वी सरस्वतीपूजन करून सोहळ्याचा प्रारंभ करण्यात आला. 'चपराक प्रकाशन'चे संपादक घनश्याम पाटील यांनी सर्व मान्यवर पाहुण्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक करताना त्यांनी 'फर्स्ट डे फर्स्ट शो' हे 'चपराक'चे ८८ वे प्रकाशन असल्याचा अभिमानाने उल्लेख केला, तेव्हा उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना दाद दिली. घुमान संमेलनाच्या वेळी स्टॉल टाकण्याचा विषय असो किंवा पिंपरी संमेलनात 'चपराक'चे अंक जप्त करण्याचा आणि पुन्हा आणून देण्याचा प्रकार असो... या प्रकाशनाने कायमच धडाडीने आणि एका विशिष्ट भूमिकेने साहित्यजागर चालविला आहे, असे पाटील यांनी या वेळी नमूद केले.

'बुकगंगा'चे मंदार जोगळेकर यांनीही या वेळी आपले मनोगत व्यक्त केले. 'ई-बुक'सारख्या प्रकाराला वाढती मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. लेखक ब्रह्मे यांचे लेख वाचताना वेगळ्या प्रकारचा आनंद मिळतो, असेही ते म्हणाले. साखरप्यासारख्या छोट्या गावात उघडलेल्या कॉल सेंटरचा आणि तेथे

## '७० एमएम' प्रकाशन सोहळा...

मिळणाऱ्या प्रतिसादाचा अनुभवही रसिकांना भावला.

स्मिता पाटील वळसंगकर यांनी खुमासदार शैलीत, ब्रह्मे यांच्या पुस्तकात काय काय आहे, याचे झलकरूपी 'ट्रेलर' सादर केले. त्यालाही श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यानंतर आपले मनोगत व्यक्त करताना ब्रह्मे यांनी, आजच्या पिढीतील सर्वच पत्रकारांनी आपल्या लेखनाचे दस्तावेज तयार केले पाहिजेत, असे आवर्जून सांगितले. ल्युमिए बंधू आणि दादासाहेब फाळके यांचे स्मरण करताना, पुढील पिढ्यांसाठी आपले लेखन आपण पुस्तकांच्या माध्यमातून कायमस्वरूपी जतन केले पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले. 'चपराक प्रकाशन'च्या सर्व टीमचे, विशेषतः या पुस्तकाच्या निर्मितीत हातभार असलेले समीर नेर्लेकर (मुखपृष्ठ), बजरंग लिंभारे (मांडणी व सजावट), मोरेश्वर ब्रह्मे (मुद्रितशोधन), शुभांगी गिरमे, तुषार उथळे पाटील यांचे त्यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र गुर्जर, संजय सोनवणी, 'महाराष्ट्र टाइम्स'चे वृत्तसंपादक श्रीधर लोणी, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, ज्येष्ठ निवेदक आनंद देशमुख, इंदौरचे विश्वनाथ शिरढोणकर, कवयित्री आणि लेखिका चंद्रलेखा बेलसरे, चित्रपट निर्माते अक्षय यशवंत दत्त आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे मिलिंद जोशी यांनी ब्रह्मे यांचा संमेलनाध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते सत्कार केला. ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे हेही त्या वेळी उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर रसिकांनी चहापानाचा आस्वाद घेत, केवळ शंभर रुपयांत उपलब्ध करून दिलेल्या या पुस्तकाच्या विक्रीस जोरदार प्रतिसाद दिला.